१५ वा वित्त आयोग
(सन २०२०-२०२५)

१५ व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाना देण्यात येणा-या अनुदान वितरणाबाबतचे सन २०२०-२१ साठीचे निकष व संनियत्रण याबाबत मार्गदर्शक सूचना.

# महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः पंविआ-२०२०/प्र.क्र.५९/ वित्त-४

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

तारीख: २६ जून,२०२०.

संदर्भ -

१. शासन निर्णय क्रमांक पविआ/२०२०/प्र.क्र.३१/वित्त-०४ दि.०९.०३.२०२०.
२. शासन पत्र क्रमांक :- जीपीडीपी-२०२०/प्र.क्र.३१/ पंरा-६ , ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २८.०४.२०२०.
३. शासन निर्णय क्रमांकः पेमेंट ४७१९/प्र.क्र.०७/ आ.स.क. ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १९.०५.२०२०.
४. केंद्र शासनाचे पत्र क्र.१५(२)एफसी-एक्सव्ही/एफसीडी/२०२०-२५, दि.१.६.२०२० चे पत्र.
५. केंद्र शासनाचे पत्र क्र.एफ.५(४) एफसी-एक्सव्ही /एफसीडी /२०२०-२५, दि.१७.६.२०२० चे पत्र

प्रस्तावना -

पंधराव्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार दि.१ एप्रिल, २०२० ते दि. ३१ मार्च, २०२५ या कालावधीत केंद्रशासनाकडून राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी राज्याला मुलभूत /बेसिक अनुदान (अनटाईड ) व बंधित अनुदान ( टाईड ) या दोन प्रकारच्या अनुदानाच्या स्वरूपात निधी देण्यात येणार आहे. प्रस्तुत अनुदान जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत या तिन्ही स्तरासाठी उपलब्ध करण्यात येणार आहे.

२. पंधराव्या केंद्रिय वित्त आयोगाच्या दि.१ एप्रिल, २०२० ते दि. ३१ मार्च, २०२५ या पाच वर्षाच्या कालावधीत ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी निधी प्राप्त होणार आहे. केंद्र शासनाने राज्यांसाठी निधी वितरीत करताना सदर निधीची परिगणना सन २०११ च्या जनगणनेनुसारची लोकसंख्या व क्षेत्रफळ या निकषांनुसार केली आहे. प्रस्तुत निधी १) मुलभूत /बेसिक अनुदान (अनटाईड ) व २) बंधित अनुदान (टाईड ) या दोन प्रकारच्या अनुदानाच्या स्वरूपात प्राप्त होणार असून ते ५०-५०% च्या प्रमाणात विभागण्यात आले आहे. त्यानुसार १५ व्या वित्त आयोगांतर्गत वरील दोन प्रकारच्या अनुदानाच्या स्वरूपात प्राप्त होणारा निधी पंचायत राज संस्थाना वितरणाबाबत १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशी तसेच केंद्रिय

Scanned by Scanner Go

पंचायतराज मंत्रालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने राज्यातील पंचायतराज संस्थांसाठी निधी वितरित करण्याबाबतचे निकष ठरविणे, वितरित निधीतून पंचायतराज संस्थानी करावयाच्या बाबी ठरविणे तसेच निधी खर्च करताना पंचायतराज संस्थानी पालन करावयाची मार्गदर्शक तत्वे/सूचना ठरविणे याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता त्यानुसार खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**शासन निर्णय -**

अ) १५ व्या वित्त आयोगाच्या अंतरिम अहवालातील ( सन-२०२०-२१) प्रकरण-५ मुद्दा क्र.५.३ (v ) नुसार केंद्र शासनाव्दारे प्राप्त स्थानिक स्वराज्य संस्थांकरिताचा निधी संबंधित राज्याच्या वित्त विभागाव्दारे संबंधित पंचायत राजच्या तिन्ही स्तरांवर (ग्रामपंचायत,पंचायत समिती, जिल्हा परिषद ) खालीलप्रमाणे हस्तांतरीत करण्यात येईल.

**निधी वितरणाचे प्रमाण -**

मुलभूत/बेसिक अनुदान (अनटाईड) व बंधित अनुदान (टाईड) या दोन्ही अनुदानाच्या वितरणाचे पंचायतराजच्या प्रत्येक स्तरावरील निश्चित प्रमाण (exact proportion ) राज्य शासनाव्दारे खालील प्रमाणे ठरविण्यात आले असून याबाबत संदर्भीय क्रमांक १ अन्वये दि.०९.०३.२०२० रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | निधी वितरण प्रमाण |
| --- | --- | --- |
| १ | ग्रामपंचायत | ८०% |
| २ | पंचायत समिती | १०% |
| ३ | जिल्हा परिषद | १०% |

१५ व्या वित्त आयोगाच्या अंतरिम अहवालातील (सन २०२०-२१ )प्रकरण-५ मुद्दा क्र.५.३ ( ii ) आणि (v) नुसार १५ व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या निधी वितरणाचे निकष खालीलप्रमाणे आहेत.

**निधी वितरणचे निकष**

| अ.क्र. | निकष | टक्केवारी |
| --- | --- | --- |
| १ | जिल्हयाची ग्रामीण लोकसंख्या (सन-२०११ च्या जनगणनेनुसार) | ९०% |
| २ | जिल्हयाचे ग्रामीण क्षेत्रफळ | १०% |
|  | एकूण | १००% |


Scanned by Scanner Go

सदर हस्तांतरण, केंद्रशासनाकडून निधी प्राप्त झाल्यापासून १० कार्यालयीन दिवसांच्या आत वितरित होणे अनिवार्य आहे. निधी वितरणास विलंब झाल्यास सदर निधी व्याजासहीत वितरित करावा लागेल. मागील वर्षाच्या बाजार कर्जावरील प्रभावी व्याज दराच्या प्रमाणात हे व्याज आकारण्यात येईल.

ब) १५ व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या निधीतून पंचायत राज संस्थांनी करावयाच्या बाबी

१. <u>मुलभूत / बेसिक अनुदान</u> हा अबंधित (अनटाईड) स्वरूपाचा आहे.सदर अनुदानाचा ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांनी कर्मचारी पगार तथा आस्थापना विषयक बाबी वगळून इतर स्थानिक गरजांनुसार (Location Specific felt Needs ) आवश्यक बाबींवर वापर करावा.

२. <u>बंधित / टाईड अनुदान</u>

बंधित अनुदानचा वापर पुढील पायाभूत सेवांसाठी करावयाचा आहे :-

१. स्वच्छता आणि हागणदारीमुक्त स्थानिक स्वराज्य संस्थांची देखभाल व दुरूस्ती

२. पेयजल पाणीपुरवठा, जल पुर्नभरण / पावसाच्या पाण्याची साठवण (रेन वॉटर हार्वेस्टिंग), जल पुर्नप्रक्रिया (वॉटर रिसायकलींग).

बंधित अनुदानाचा ५०% निधी हा वरील नमूद दोन बाबींसाठी करावयाचा आहे. जर वरील दोन बाबींपैकी एकाची पुर्णत: अमलबजावणी झाली असेल तर त्यासाठीचा निधी दुस-या बाबीसाठी खर्च करण्यात यावा.

क) अनुदान वितरणाची कार्यपध्दती

१. <u>मुलभूत /बेसिक अनुदान ( अनटाईड )</u> :- पंचायत राज मंत्रालयाच्या शिफारशींच्या आधारे मुलभूत अनुदानाचे वितरण २ हप्त्यांमध्ये वित्त आयोग कक्ष, वित्त मंत्रालय, भारत सरकार यांचे व्दारे वितरित करण्यात येईल. त्यासाठी हप्ता वितरणानंतर केंद्र शासनाच्या दि.१.६.२०२० च्या पत्रातील ANNCXURE II मध्ये देण्यात आलेल्या मसूद्यात निधी हस्तांतरण प्रमाणपत्र केंद्र शासनास सादर करणे अनिवार्य आहे.

२. <u>बंधित / टाईड अनुदान</u> :- पंचायत राज मंत्रालय (भारत सरकार) यांच्या शिफारशींच्या आधारे बंधित अनुदानाचे २ हप्त्यांमध्ये वितरण करण्यात येईल. <u>अनुदानाची शिफारस करण्यापुर्वी</u> पेयजल स्वच्छता विभाग, जलशक्ती मंत्रालय आणि पंचायत राज मंत्रालय व्दारा खालील बाबींचे मुल्यांकन करण्यात येईल.

१. हागणदारीमुक्त स्थानिक स्वराज्य संस्थाची देखभाल आणि स्थिती.



Scanned by Scanner Go

२. पेयजल पाणीपुरवठा, जल पुर्नभरण / पावसाच्या पाण्याची साठवण (रेन वॉटर हार्वेस्टिंग), जल पुर्नप्रक्रिया (वॉटर रिसायकलींग).

३. GPDP (ग्रामपंचायत विकास आराखडा) अपलोड करणे तसेच १५ व्या वित्त आयोगाच्या निधीच्या उपयोगीता संबंधित माहिती वेबसाईटवर भरणे.

४. जलशक्ती मंत्रालयाव्दारे नमूद अटी व्यतिरिक्त बंधित अनुदानाच्या उद्येशा संबंधित देण्यात आलेल्या इतर अटींची पुर्तता करणे.

सन २०२१-२२ चे पात्रता मुल्यांकन सन २०२०-२१ च्या परिणामांवर आधारीत असेल. पुढील वर्षासाठी सुध्दा समान प्रक्रिया राबविली जाईल.

ड) मार्गदर्शक सूचना :-

१) १५ व्या वित्त आयोगाच्या निधी राज्य शासनाकडून जिल्हा परिषदांना वितरीत करण्यात येईल. मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) यांच्या बी.डी.एस. वर प्राप्त झाल्यानंतर जिल्हा परिषदांनी तो निधी तात्काळ कोषागारातून काढून १५ व्या वित्त आयोगासाठी स्वतंत्रपणे उघडण्यात आलेल्या बँक खात्यात जमा करून घ्यावा. जिल्हा परिषदांना अनुदान प्राप्त झाल्यानंतर ते विहीत केलेल्या निकषांच्या आधारे तातडीने (जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत) खात्यावर इ.सी.एस. ( Electronic Clearance System) / एन.इ.एफ.टी. (National Electronic Fund Transfer) किंवा आर.टी.जी.एस.( Real Time Gross Settlement ) या आधुनिक बँकिंग सिस्टीमद्वारे संबंधित (जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत) खात्यावर वर्ग करावयाचे आहे. त्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ज्या बँका निधी हस्तांतरणाच्या वरील आधुनिक सुविधा उपलब्ध करुन देतील, अशा आय.एफ.एस.सी. (IFSC) कोड धारण केलेल्या व एम.आय.सी.आर. (MICR) कोड असलेल्या राष्ट्रीयकृत बँकेत बचत खाते उघडण्यात यावे.

२) १५ व्या वित्त आयोगाचा निधी पंचायत राज संस्थांनी (जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत ) राष्ट्रीयकृत बँकामध्ये वरील अनु.क्र. १ मध्ये नमूद केल्यानुसार सेवा उपलब्ध करून देईल, त्या बँकेच्या बचत खात्यातच ठेवावा.

३) सद्याच्या कोरोणाच्या वाढत्या प्रादूर्भावामुळे उद्दभवलेल्या तांत्रिक व प्रशासकीय आडचणीमुळे १५ व्या वित्त आयोगाच्या बेसिक ग्रँटच्या पहिल्या हफ्त्याचे वितरण पंचायतराज संस्थांना अर्थसंकलपीय वितरण प्रणाली द्वारे (BEAMS वर) करण्यात येत आहे.या पुढील ग्रँटच्या हफ्त्याचे वितरण (PFMS) Public Finance Management System द्वारे पंचायतराज संस्थाच्या तिन्ही स्तरांवर करण्यात येईल.

Scanned by Scanner Go

४) १५ व्या वित्त आयोगांतर्गत खात्यातील व्यवहार ग्रामपंचायतीच्या नावाने सरपंच व ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी संयुक्त स्वाक्षरीने व्हावे. तसेच पंचायत समितीच्या नावाने गट विकास अधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या नावाने मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या स्वाक्षरीने व्हावे.

५) शासनाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार वितरीत निधीतून ग्रामपंचायतींनी त्यांच्या स्तरावर करावयाच्या बाबींच्या नियोजनाचे अधिकार व जबाबदारी ग्रामपंचायतीच्या सभेची (कमिटीची) राहील. मात्र ग्रामपंचायतीच्या सभेत (कमिटीत) घेतलेले निर्णय, ग्रामपंचायतींनी वेळोवेळी ग्रामसभेत सादर करणे आवश्यक राहील.

६) **तथापि संबंधीत पंचायत राज संस्थेस निधी प्राप्त झाल्यापासून २ महिन्याच्या कालावधीत (आचारसंहितेचा कालावधी वगळून) जर प्राप्त निधीचे नियोजन त्यांच्या सभेमध्ये झाले नाही तर त्या निधीच्या नियोजनाचे अधिकार जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि ग्रामपंचायत स्तरासाठी संबंधीत ग़टविकास अधिकारी यांना राहतील. शासनाने विहित केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर बाबींवर निधी खर्च केल्यास ती रक्कम संबंधित जबाबदार अधिका-यांकडून/कर्मचा-याकडून वसूल करण्यात येईल.**

७) वित्त आयोगाच्या निधीच्या खर्चाचे नियोजन करताना गरजेवर आधारित नियोजन होईल याचीही दक्षता घ्यावी.

८) शासनातर्फे १५ व्या वित्त आयोगांतर्गत देण्यात येणा-या बेसिक ग्रँट तथा टाईट ग्रँटचे शासनस्तरावरुन स्वतंत्र वितरण आदेश निर्गमित करण्यात येतील. त्यानुसार वरील ग्रँटचे स्वतंत्र हिशेब ठेवणे व त्यांचा पंचायतराजच्या तिन्ही स्तरासाठी एकत्रित आर्थिक व भौतिक अहवाल शासनास पाठविणे व निधी खर्च झाल्यावर त्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास व महालेखापाल कार्यालयास सादर करणे याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांची असेल.

९) ग्रामीण स्थानिक संस्थांच्या १५ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीचे हिशोब ठेवणे, त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे आणि त्यांचे लेखे प्रिया-सॉफ्ट या संगणकिय आज्ञावलीत ठेवणे, याबाबीच्या समन्वयनाची जबाबदारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद यांना देण्यात येत असून त्यांचेवर या कामी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे नियंत्रण असेल.

१०) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी पंचायतराज संस्थाच्या तिन्ही स्तरावरील १५ व्या वित्त आयोगांतर्गत वितरीत निधीच्या खर्चाचा आढावा घेण्यासाठी दर महिन्यात एक बैठक घ्यावी.

११) पंचायतराज संस्थाच्या तिन्ही स्तरावर १५ व्या वित्त आयोगांतर्गत वितरीत निधीमधून होणा-या बाबी/योजना/कार्यक्रम हे निकषांप्रमाणे असल्याचे तपासून त्यांचे हिशेब, आर्थिक व भौतिक अहवाल

Scanned by Scanner Go

त्या त्या तालुका गटविकास अधिका-याने त्याच्या सहीने उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचा... यांचेमार्फत दरमहा मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना पाठवावेत.

१२) पंचायतराज समिती संस्थाच्या तिन्ही स्तरावरील निधीच्या विनियोजनाच्या नियंत्रणाची व समन्वयनाची जबाबदारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांची राहील.

१३) मान्य योजना व कार्यक्रमांव्यतिरिक्त इतर बाबी घेऊ नयेत. इतर बाब निकडीची वाटल्यास त्यासाठी राज्य शासनाची मंजूरी घ्यावी. (या सदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सहीच्या पत्रानेच शासनास पत्रव्यवहार करावा)

१४) मालमत्ता कर- कायद्याप्रमाणे जे कर पंचायत राज संस्था आकारु शकतात, ते कर त्यांनी पूर्णपणे आकारावेत व उपभोक्ता शुल्क (User charges) वसूल करावेत आणि त्याचा हिशेब ठेवावा.

१५) पंचायत राज संस्थांकडून नागरिकांना दिल्या जाणा-या सेवांचा दर्जा त्या सेवांबाबत शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या निकषांनुसार असेल याची दक्षता घ्यावी.

१६) ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद स्तरावरील अधिकारी/कर्मचा-यांना शासनाकडून प्राप्त सूचनांबाबत अद्ययावत माहिती देण्यासाठी वेळोवेळी प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करावे.

१७) शासनाने विहित केलेल्या मान्य बाबींवरच या निधीतून प्राप्त होणा-या व्याजाची रक्कम खर्च करावी व त्याचे हप्तानिहाय स्वतंत्र हिशेब ठेवावेत आणि त्याचा आर्थिक व भौतिक अहवाल दरमहा शासनास पाठवावा.

१८) ग्रामपंचायतींचे लेखा परीक्षण विहित वेळेत होईल याची काळजी घ्यावी व त्रुटींचे निराकरण तात्काळ करावे.

१९) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषद पातळीवर गुणवत्ता नियंत्रणासाठी विहित प्रक्रिया अंगीकारून आऊटसोर्सिग पध्दतीने त्रयस्त पक्ष नियंत्रण कक्ष (Third Party control / vigilance cell ) गठित करावा व पंचायत राज संस्थामार्फत होणारी कामे / दिल्या जाणा-या सेवा / योजना / कार्यक्रम यांचा दर्जा व गुणवत्ता विहित केलेल्या निकषानुसार राहील याची खबरदारी घ्यावी.

**२०) जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी १५ व्या वित्त आयोगांतर्गत घेतलेल्या कामाच्या संदर्भातील प्राप्त होणा-या तक्रारीचे तात्काळ निराकरण व्हावे यासाठी जिल्हा परिषद स्तरावर तक्रार निवारण कक्ष उभारावा व तक्रारींचे निवारण वेळचेवेळी करावे.**

२१) निधी वितरणासाठी राज्य शासनाने जे निकष दिले आहेत त्यानुसार प्रगणन (Calculations) करण्यासाठी डाटाबेस तयार करुन घ्यावा म्हणजे निधी वितरण विहित वेळेत करता येईल.

२२) पंचायत राज संस्थांनी प्राप्त निधीपेक्षा जास्त खर्च करु नये व जास्तीचे आर्थिक दायीत्व निर्माण करु नये.



Scanned by Scanner Go

२३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी ह्या शासन निर्णयाच्या प्रती त्यांचे अधिनस्त सर्व जिल्हा परिषद/ पंचायत समिती/ ग्रामपंचायत स्तरावरील अधिका-यांना तात्काळ उपलब्ध करून द्याव्यात.

२४) १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून ज्या बाबीं /योजना / कार्यक्रम हाती घेण्यात आले असतील त्याचे दर्शक फलक संबंधित बाबीं /योजनां / कार्यक्रमाच्या ठिकाणी ठळकपणे दिसतील असे लावावेत.

२५) निधी वितरणास विलंब झाल्यास त्यावर द्यावयाच्या व्याजाची जबाबदारी संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची राहील.

२६) संदर्भीय क्रमांक २ मधील दि.२८.०४.२०२० च्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशाप्रमाणे १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सन २०२०-२१ या वर्षीचा ग्रामपंचायत विकास आराखडा सुधारित करून प्लॅन प्लस वर अपलोड करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन निर्णय शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२००६२६१२३४१५००२० असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRAVIN DEVICHAND JAIN

Digitally signed by PRAVIN DEVICHAND JAIN
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c7f82404d3bf725fa292c76bb1649f4e73505a8c846f3f83bdee9968a87f1d6c, postalCode=400001, street=MANTRALAYA,MUMBAI, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=PRAVIN DEVICHAND JAIN
Date: 2020.06.30 14:01:37 +05'30'

(प्रविण देविचंद जैन)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४) मा.मंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव
५) मा. राज्यमंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव
६) मा.विधानसभा व विधान परिषद सदस्य.
७) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
८) मा.अ.मु.स. (ग्रा.वि. व पं.रा.) यांचे स्वीय सहाय्यक
९) महालेखापाल, महाराष्ट्र - १ (लेखापरीक्षा), मुंबई (पाच जादा प्रतीसह)
१०) महालेखापाल, महाराष्ट्र - २ (लेखापरीक्षा), नागपूर (पाच जादा प्रतीसह)
११) सर्व विभागीय आयुक्त. (महसूल)
१२) सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष.

Scanned by Scanner Go